जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JUN 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठामध्ये डॉ. बापूजी साळुंखे यांची जयंती उत्साहात साजरी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची जयंती साजरी करण्यात आली. शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या इमारतीसमोरील डॉ. बापूजी साळुंखे पूर्णाकृती पुतळ्यास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले उपस्थित होते.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JUN 2025

पुण्यनगरी

# विद्यापीठात डॉ. बापूजी साळुंखे जयंती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात सोमवारी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची जयंती साजरी करण्यात आली. शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या इमारतीसमोरील डॉ. बापूजी साळुंखे पूर्णाकृती पुतळ्यास कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, संशोधक विद्यार्थी, प्रशासकीय सेवक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JUN 2025
सकाळ



# विद्यापीठात डॉ. बापूजी साळुंखे यांना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात आज शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची जयंती साजरी करण्यात आली. शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या इमारतीसमोरील डॉ. बापूजी साळुंखे पूर्णाकृती पुतळ्यास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JUN 2025
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ उन्हाळी सत्रातील परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मार्च-एप्रिल २०२५ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तरच्या परीक्षा सुरू आहेत. सोमवारी बीए., बीएस्सी., एमबीए, बी. टेक., एम. टेक., एमसीए, पी. जी. डिप्लोमा इन बायो-इनफर्मेशन, डिप्लोमा इन इंडस्ट्रीयल सेफ्टी हेल्थ ॲन्ड एन्व्हारमेंटल अशा ३८ अभ्यासक्रमाची १७६ परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरळीत पार पडली. १० हजार १६ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. आत्तापर्यंत झालेल्या परीक्षांपैकी ३५९ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांचा पुढील शिक्षणाचा मार्ग रिकामा झाला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JUN 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या ३५१ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने उन्हाळी सत्रातील ३५१ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांत पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू आहेत. सोमवारी बीए बीएस्सी, बीबीए, एमबीए, बीटेक, एमटेक, एमसीए, पीजी डिप्लोमा इन बायो इन्फॉर्मेटिक्स आदी ३८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा १७६ केंद्रांवर झाल्या. १० हजार १६ विद्यार्थी उपस्थित होते. भरारी पथकाकडून सांगली जिल्ह्यातून तीन गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आली आहे.